**FORM G**
**INVITATION FOR EXPRESSION OF INTEREST FOR**
**SQ INFRASTRUCTURE PRIVATE LIMITED OPERATING IN REAL ESTATE BUSINESS AT MUMBAI**

(Under Sub-Regulation (1) of Regulation 36A of the Insolvency and Bankruptcy Board of India (Insolvency Resolution Process for Corporate Persons) Regulations, 2016)

| SL. | RELEVANT PARTICULARS | |
|---|---|---|
| 1. | Name of the corporate debtor along with PAN & CIN/ LLP No. | SQ Infrastructure Private Limited<br>CIN – U45400MH2001PTC133888<br>PAN – AABCG7392R |
| 2. | Address of the registered office | 5, Floor - 1, Plot No. 7, Sharda Sadan, Swami Gyanjivandas Marg, Dadar Rly. Stn. Dadar (East), Mumbai- 400014 |
| 3. | URL of website | No website |
| 4. | Details of place where majority of fixed assets are located | Mumbai, Maharashtra |
| 5. | Installed capacity of main products/ services | NA |
| 6. | Quantity and value of main products/ services sold in last financial year | Nil |
| 7. | Number of employees/ workmen | 0 |
| 8. | Further details including last available financial statements (with schedules) of two years, lists of creditors are available at URL: | Details/Information can be sought by writing an email to the Resolution Professional at cirp.sqinfrastructure@gmail.com |
| 9. | Eligibility for resolution applicants under section 25(2)(h) of the Code is available at URL: | The eligibility criteria is mentioned in detailed Invitation forExpression of Interest to submit Resolution Plan(s) ("Invitation") |
| 10. | Last date for receipt of expression of interest | 2nd March, 2024 |
| 11. | Date of issue of provisional list of prospective resolution applicants | 12th March, 2024 |
| 12. | Last date for submission of objections to provisional list | 17th March, 2024 |
| 13. | Date of issue of final list of prospective resolution applicants | 27th March, 2024 |
| 14. | Date of issue of information memorandum, evaluation matrix and request for resolution plans to prospective resolution applicants | 1st April, 2024 |
| 15. | Last date for submission of resolution plans | 1st May, 2024 |
| 16. | Process email id to submit Expression of Interest | cirp.sqinfrastructure@gmail.com |

Date: 16th February,2024
Place: Mumbai

ABHIJIT S. GOKHALE IBBI/ IPA-002/ IP-N00964/ 2020-2021/ 13092

**Sd/-**
Abhijit Gokhale
Resolution Professional
Registration Number : IBBI/IPA-002/IP-N00964/2020-2021/13092
Registered Address : A/1903, 19th Floor, N L Aryavarta, N L Complex, Dahisar East, Op. Anand Nagar, Mumbai - 400068
For SQ Infrastructure Private Limited

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# अनिष्ट मंगळ ग्रह लोकवस्तीसाठी इष्ट ठरतोय

विज्ञानाची झेप कुठपर्यंत जाईल याला कोणतीही सीमा राहिलेली नाही. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे हे ब्रह्मांडच इतके प्रचंड आणि विलक्षण आहे की ज्याचा प्रारंभ आणि शेवट कोणालाही माहीत नाही. ज्याच्या निर्मितीविषयीच एकवाक्यता नसल्याने या विश्वामध्ये निर्माण झालेल्या वेगवेगळ्या घटकांविषयी माणसाच्या मनात सातत्याने कुतुहल आणि जिज्ञासा निर्माण होत असते. अगदी स्वतः च्या जन्म आणि मृत्यूच्या संदर्भातही मनुष्याला अजून कोणताही निश्चित उलगडा झालेला नाही. अशावेळी या विश्वाच्या पसाऱ्यामध्ये पृथ्वी, ग्रह, तारे यांचा जो काही प्रभाव दिसतो. त्याविषयीसुद्धा मनुष्याच्या मनात आकर्षण निर्माण होणे स्वाभाविक ठरते. त्या जिज्ञासेतूनच एकेका ग्रहाची , उपग्रहांची किंवा चंद्रतारकांची माहिती करून घेण्याची तो धडपड करताना दिसतो आहे. एकेकाळी अत्यंत अशक्य आणि दूरापास्त वाटणारा चंद्र आता मनुष्याच्या विचारांच्या कक्षेत आला. आणि चंद्रावर कोणत्या प्रकारचे वातावरण आहे याचाही त्याला शोध लागला. भारतीय ज्योतिषशास्त्रामध्ये ग्रहताऱ्यांचे तर एक वेगळेच महत्व आहे. या ग्रहांविषयीसुद्धा आता एकेक मोहीमा सुरू झालेल्या आहेत. चंद्रावर मनुष्यवस्ती शक्य नाही. पण मंगळावर ती करता येऊ शकते. असा शोध आता नव्याने सिद्ध होऊ लागला आणि गेल्या वीस पंचवीस वर्षापासून याबाबतचे अधिक संशोधन सुरू झाले. जो मंगळ भारतीयांच्या कुंडलीमध्ये अनिष्ट म्हणून गणला जातो तोच मंगळ आता मनुष्यवस्तीसाठी इष्ट ठरू शकेल. अशी आशा निर्माण झालेली आहे. अलिकडेच प्रसिद्ध अशा टेस्ला आणि एक्स या जगदविख्यात आणि तंत्रज्ञानातल्या अग्रगण्य कंपनीचे सर्वेसर्वा एलन मस्क यांनी २०२९ नंतर मंगळावर दहा लाख लोकांना घेऊन जाण्याचे जाहीर केले आहे. किंबहुना तशा प्रकारची तयारी ते करीत आहेत. मस्क हे तंत्रज्ञानातल्या अनेक प्रकारच्या शोधांसाठी आणि वेगवान उपकरण निर्मितीसाठी प्रसिद्ध मानले जातात. त्यांनीच ही घोषणा केल्याने जगाच्या भुवया उंचावल्या गेल्या आहेत. यापूर्वी त्यांनी २०११ ला अशाच प्रकारची घोषणा करून नासाच्या मदतीने मंगळावर २०२१ पर्यंत जाण्याचे स्वप्न जाहीर केले होते.

### दहा लाख लोकांना नेण्याचे उद्दीष्ट

अंतराळ तंत्रज्ञानही वेगाने विकसित होत आहे. नासा किंवा इस्त्रोसारख्या संस्थात त्यात चांगलीच प्रगती करीत आहेत. कदाचित म्हणूनच नासाच्या मदतीने मस्क यांनी आता २०२९ पर्यंतचे नवे लक्ष्य निर्धारित करून मंगळ मोहीम आखली असावी. तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात अल्पावधीत मोठी आणि भरीव कामगिरी केल्याचे श्रेय मस्क यांच्याकडे जाते. अगदी अलिकडच्या आर्टिफिशिअल इंटिलिजन्सच्याबाबतीतसुद्धा त्यांनी भविष्यकाळात होणाऱ्या मोठ्या बदलांचे संकेत दिले होते आणि आता याच आर्टिफिशिअल इंटिलिजन्सचा दबाव आणि प्रभाव सगळ्याच क्षेत्रांमध्ये पाहायला मिळतो आहे. तंत्रज्ञान क्षेत्रातली एकाअर्थी मक्तेदारी असलेल्या मस्क यांच्या कंपनीकडून केली गेलेली ही मंगळ मोहीमेची आखणी म्हणजे निश्चितपणे पुढच्या पाच-दहा वर्षात वास्तवात येणारी बाब ठरू शकते. ज्यावेळी ते दहा लाख लोकांना मंगळावर घेऊन जाण्याचे उद्दीष्ट ठेवतात त्याअर्थी मोठ्या मोहीमेची व्यापकता किंवा तांत्रिकतासुद्धा किती भव्य स्वरूपाची असेल याची आपण कल्पना करू शकतो. यासाठी लागणाऱ्या सर्व प्रकारच्या तांत्रिक आणि कायदेशीर बाबींसाठी त्यांनी नासाचे घेतलेले साहाय्य त्यांच्यासाठी खूप मोलाचे ठरणार आहे. नासालासुद्धा अशाच तंत्रज्ञान क्षेत्रातील परिपूर्णता असलेल्या व्यक्ती आणि कंपनीची आवश्यकता होतीच. गेली काही वर्षे नासाकडूनही स्वतंत्र मंगळमोहीम राबवली जाते आहे. यापूर्वी झालेल्या मोहीमेत मंगळाचा पृष्ठभाग आणि तिथल्या वातावरणाचा अभ्यास केला गेला. मंगळावर पाणी उपलब्ध असल्याचा पहिला पुरावा यापूर्वीच मिळाला आहे आणि ज्याअर्थी तिथे पाणी आहे त्याअर्थी तिथे मनुष्यवस्ती होऊ शकते. अशा निष्कर्षाप्रत या क्षेत्रातले तज्ज्ञ आलेले आहेत. पुढच्या काही वर्षात प्रायोगिक तत्त्वावर मंगळावरच्या वस्तीचा अंदाज घेतला जाईल. आणि जर त्यात यश आले तर तिथे कायमस्वरूपी मनुष्यवस्ती होऊ शकते का याचादेखील अभ्यास होऊ शकेल. अनेक शास्त्रज्ञांच्या मते काही विशिष्ट गोष्टींची खबरदारी किंवा काळजी घेतली किंवा आवश्यक त्या उपाययोजना केल्या तर तेदेखील शक्य होईल असे सांगितले जाते आहे.

### भारतीयांच्या मनातला मंगळ

अनिष्टकारक वाटणारा मंगळग्रह आता कुंडलीच्या कक्षा ओलांडून आकाशमंडलाचे महत्वाचे आकर्षण ठरू शकतो. भारतात काहीठिकाणी मंगळग्रहांची मंदिरे आहेत. मंगळाची ही अनिष्टता टाळण्यासाठी किंवा मंगळाला लाभदायक करून घेण्यासाठी बऱ्याच पूजाअर्चा होत असतात. जे नवग्रह स्तोत्र म्हटले जाते त्यामध्ये धरणीगर्भ संभूतं, विद्युतकांती समप्रभं। कुमारं शक्तीहस्तं तं मंगलं प्रणाह्मम । अशाप्रकारे मंगळाची स्तुती केली जाते.याचा अर्थ धरणीच्या पोटातून जन्म घेतलेल्या वीजेसारखी अंगकांती असलेल्या , हातात शक्ती हे शस्त्र धारण केलेल्या कुमार स्वरूप अशा त्या मंगळाला मी नमस्कार करतो. आता जर धरणीच्या पोटातून हा मंगळ जन्माला आला असेल तर तो एकाअर्थी पृथ्वीचाही पुत्र ठरतो. आणि पृथ्वीवर जर मनुष्यवस्ती असेल तर मग मंगळावरही असू शकेल. या युक्तिवादाला एकाअर्थी बळच मिळते. परंतु मंगळाविषयी असलेले धार्मिक अंगाचे समज आणि त्याला ग्रहमालेतील एक प्रमुख ग्रह मानून त्याचा भौगोलिकदृष्ट्या केलेला अभ्यास या दोनही दृष्टीने एकूणच मंगळग्रहाची उपयुक्तता सिद्ध होते. भविष्यकाळातील या मंगळमोहीमा जर यशस्वी झाल्या तर अनेकांच्या कुंडलीत असलेला वाटणारा अनिष्ट ग्रह एकूणच मानवजातीसाठी किती उपयुक्त आहे हेच सिद्ध होणार आहे. अर्थात एकीकडे विज्ञान तंत्रज्ञान आपापल्या जिज्ञासांमधून शोध लावत राहातील. परंतु प्रामुख्याने भारतीय जनमानसामध्ये एकूणच या सृष्टीविषयी असलेली श्रद्धा फारशी बदलण्याची शक्यता दिसत नाही. आज जरी भारताचे चांद्रयान चंद्रावर गेले असले तरी भारतीयांच्या मनात असलेली चंद्राविषयीची भावना बदललेली नाही ही वस्तुस्थिती आहे.

## सुविचार

विलास कोळेकर
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

वाईट परिस्थिती आणि कठीण काळ हाच माणसाचा सर्वात मोठा गुरु असतो.त्याकाळात एवढं शिकायला मिळतं की त्या ज्ञानाची शिदोरी जन्मभर पुरते.

## पंचांग

शुक्रवार १६ फेब्रुवारी २०२४
शक १९४५ शोभननामसंवत्सर



माघ शुक्ल सप्तमी
नक्षत्र : भरणी

-: जन्मराशी :-
००-०१ ते १४-४२ मेष
१४-४३ ते २४-०० वृषभ

रवी उदय- ०७-०८
रवी अस्त- १८-३८

रथ सप्तमी, भीष्माष्टमी, शनीचा सायं पश्चिमेस लोप, सूर्यनमस्कार दिन, नर्मदा जयंती

## कविता...
## 'जमुरांचा नाच'

आभाळातल्या मळभेवर शिक्का अंधाराचा मारला होता.
स्वप्नातल्या श्रीमंतीचा मोहजाळ पेरला होता.
असं म्हणतात! कधी नव्हे तो, पहाटेचा कोंबडा आरवला होता.
कोणीतरी, 'बऱ्या' दिवसांच्या आगमनाची दवंडी देत फिरत होता.

जया आजन्म गरीबीतल्या दुःखीतांचा,
बँकेत उघडण्या खाते, रांगेत उभा होता.
'बऱ्या' दिवसांच्या प्रतिक्षेत बिचारा,
स्वप्नांचा झुल्यावर झुलत होता.

उज्वल भविष्याच्या ध्यासाने, 'चुलीतला धूर थांबला होता.
पण, महागाईच्या भस्मासूराने प्राण कंठाशी आणला होता.
आश्वासनांच्या पावसातला तो कोरडा दुष्काळ होता.
जाहिरातींच्या जेवणावळीत दीन दुबळा उपाशीच झोपत होता.

वर्षानंतर वर्ष, काळ भराभर जात होता.
अखेर विश्वासानेच, विश्वासाचा घात केला होता.
सत्तेच्या सारीपाटावरचा तो नित्त्याचाच खेळ होता.
मदारींच्या खेळामधला जमुरांचा नाच होता...

● परमेश शिवाजी ●
अे/१०२, मयुराज हाईटस, म्हात्रे नगर, ललित काटा, माणगांव, कल्याण शिळ रोड, डोंबिवली (पूर्व),
भ्रमणध्वनी : ७४००३०६५६२

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे**

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेल navakal.1923@gmail.com
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक 'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
REGD. No. MH/MR/SOUTH-143/2012-14
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४


Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande**





# रोहित, जडेजाची शतके ! सर्फराजचे अर्धशतक
# तिसऱ्या कसोटीत भारताची दमदार सुरुवात

**भारत विरुद्ध इंग्लंड यांच्यातील राजकोट येथे सुरु असलेल्या तिसऱ्या कसोटी सामन्यात कर्णधार रोहित शर्मा , रवींद्र जडेजा यांनी शतके झळकावली तर कसोटीत पदार्पण करणाऱ्या सर्फराज खानने अर्धशतक झळकावले आहे. या तिघांच्या दमदार फलंदाजीमुळे भारताला पहिल्या दिवसअखेर ५ बाद ३२६ अशी चांगली सुरुवात करता आली.**




■ राजकोट

आज राजकोटमध्ये भारताने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी घेतली . पण मार्क वूडने लागोपाठ ३ धक्के दिले सलामीवीर यशस्वी जैस्वालला त्याने १४ धावांवर बाद केले. तर शुभमन गिलला खातेही खोलू दिले नाही. रजत पाटीदार पुन्हा एकदा अपयशी ठरला त्याला हार्टलीने अवघ्या ५ धावांवर तंबूचा रस्ता दाखवला.त्यानंतर खेळाची सर्व सूत्रे कर्णधार रोहित शर्माने आपल्या हाती घेतली आणि जडेजाच्या साथीने धावसंख्या वाढवायला सुरुवात केली. या दोघांनी २०४ धावांची भागीदारी केली . रोहित शर्माने आपले ११ वे कसोटी शतक झळकावले. मात्र त्याला वूडणे बाद केले त्याने १४ चौकार व ३ षटकारांच्या सहाय्याने १३६ धावा केल्या. तर त्याला जडेजाने उत्तम साथ देताना नाबाद शतक झळकावले. रोहित शर्मा बाद झाल्यानंतर कसोटीत पदार्पण करणारा सर्फराज खान जडेजाच्या साथीला आला दोघांनी भारताला ३०० धावांचा टप्पा गाठून दिला . सर्फराज चांगली फलंदाजी करीत होता पण चोरटी धाव घेण्याच्या प्रयत्नात वूडने त्याला ६२ धावांवर धावचीत केले. त्याने ९ चौकार आणि १ षटकार ठोकला दरम्यान पहिल्या दिवसाचा खेळ थांबला तेंव्हा भारताच्या ५ बाद ३२६ धावा झाल्या होत्या. जडेजा ११० तर कुलदीप यादव १ धावेवर नाबाद आहेत. इंग्लंडच्या वूडने ६९ धावात ३ तर हर्टलीने १ बळी घेतला पहिल्या दिवसाचा खेळ पाहता भारत मजबूत स्थितीत आहे.

## बेथ मुनी पुन्हा गुजरातची कर्णधार

■ अहमदाबाद

आगामी डब्ल्यू पी एल वुमेन्स प्रीमियर लीगचा दुसरा हंगाम २५ फेब्रुवारीपासून सुरु होत आहे. या हंगामात बेथ मुनी गुजरातची कर्णधार असेल. २ टप्प्यात होणाऱ्या स्पर्धेत ५ संघ सहभागी असतील तर भारतीय अष्टपैलू स्नेह राणा उपकर्णधार असणार आहे. तसेच डब्ल्यू पी एल च्या पहिल्या हंगामात मुनीची गुजरात जायंट्स संघाच्या कर्णधारपदी नियुक्त करण्यात आले होते. पण, दुखापतीमुळे तिला पहिल्या सामन्यानंतर स्पर्धेतून बाहेर पडावे लागले. यानंतर स्नेह राणाने संपूर्ण हंगामात संघाचे नेतृत्व केले होते. दुसऱ्या हंगामात गुजरात जायंट्स २५ फेब्रुवारीला बेंगळुरूमध्ये मुंबई इंडियन्सविरुद्ध आपल्या मोहिमेची सुरुवात करणार आहे. तसेच ऑस्ट्रेलियासाठी तिन्ही फॉरमॅट खेळलेल्या मुनीने कर्णधार बनवल्याबद्दल आनंद व्यक्त केला आहे. तसेच ती म्हणाली आहे की, 'गुजरात जायंट्ससोबत परत आल्याने मला आनंद झाला आहे आणि संघाने माझ्यावर दाखवलेल्या विश्वासाबद्दल मी कृतज्ञ आहे. तसेच आमच्याकडे एक उत्तम संघ आहे आणि मला विश्वास आहे की आम्ही चांगली कामगिरी करू असे म्हणाली.



## अ‍ॅथलेटिक रचना कुमारी अखेर डोपिंगमध्ये दोषी ! १२ वर्षांची बंदी

■ नवी दिल्ली

गेल्या वर्षी गोवा येथे झालेल्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महिलांच्या हातोडाफेकीत ब्राँझपदक जिंकणाऱ्या उत्तर प्रदेशच्या रचना कुमारीवर दुसऱ्यांदा उत्तेजक चाचणीत दोषी सापडल्याबद्दल जागतिक अ‍ॅथलेटिक्सच्या अ‍ॅथलेटिक्स इंटिग्रिटी युनिटने (एआययू) १२ वर्षांची बंदी घातली आहे. येत्या १ मार्च रोजी आपला ३१ वा वाढदिवस साजरा करणाऱ्या रचना कुमारीची कारकीर्द या १२ वर्षांच्या बंदीमुळे संपुष्टात आली आहे. एआययूने गेल्या वर्षी 'आऊट ऑफ कॉम्पिटिशन''मध्ये तिची उत्तेजक चाचणी घेतली होती. त्यात तिच्या नमुन्यात स्टॅनोझोलोल मेटॅंडिनोन आणि डीहायड्रोक्लोरोमेथॅ टेस्टोटेरोन (डीएचसीएमटी) क्लेनबुटेरॉल हे उत्तेजक सापडले होते. तिच्यावर २४ नोव्हेंबर २०२३ पासून १२ वर्षांची बंदी टाकण्यात आली.

## अजिंक्यतारा चषक मल्लखांब स्पर्धा

■ मुंबई

येत्या १७ व १८ फेब्रुवारी २०२४ रोजी मल्लखांब लव संघ आणि सुविद्या प्रसारक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने मल्लखांबातील अनभिषिक्त सम्राट कै. दत्ताराम दुदम सरांना समर्पित अजिंक्यतारा चषक स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. स्पर्धेचे हे तिसरे वर्ष आहे.

मुंबई उपनगरातील ४० संस्थांमधून अंदाजे ७०० खेळाडू यात सहभागी होणार आहेत. ६/८/१०/१२/१४/१६/१८ वर्षांखालील मुले आणि मुली असे खेळाडूंचे वयोगट आहेत मल्लखांब खेळातील प्रथम पॅरा मल्लखांब स्पर्धा ही या स्पर्धेत घेण्यात येणार आहे. सहभागी प्रत्येक खेळाडूस अजिंक्यतारा पदक, सहभाग प्रमाणपत्र व भेटवस्तू देण्यात येईल तसेच प्रत्येक वयोगटात वैयक्तिक पदके, सांघिक चषक अशी भरघोस बक्षिसे देण्यात येणार आहेत. मुंबई उपनगरातील नवीन खेळाडूंना प्रोत्साहन मिळावे आणि भविष्यात यातूनच अनेक पुरस्कार विजेते खेळाडू घडावे असा मानस आहे.

सुविद्या प्रसारक संघाचे सचिव मिलिंद जोशी, स्पर्धा सचिव संचिता देवल आणि स्पर्धा प्रमुख आशिष देवल व दुदम सरांचे विद्यार्थी यांच्या एकत्रित प्रयत्नांतून ही मुंबई उपनगरातील भव्य स्पर्धा पार पडणार आहे.

## लीलाधर चव्हाण यांना जीवन गौरव

■ मुंबई

आत्माराम मोरे प्रतिष्ठानतर्फे आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीचे अध्यक्ष लीलाधर चव्हाण यांना शाल, श्रीफळ, गौरवचिन्ह व रुपये एकतीस हजार स्वरूपाचा ज्येष्ठ क्रीडा पत्रकार स्व. आत्माराम मोरे स्मृती जीवन गौरव पुरस्कार प्रतिष्ठानचे सरचिटणीस विराज मोरे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. क्रीडा संघटक लीलाधर चव्हाण यांना आंतर शालेय सुपर लीग कबड्डी स्पर्धेच्या समारोप प्रसंगी सन्मानित करण्यात आले. यावेळी मुंबई पोलीस कबड्डी संघाचे प्रशिक्षक एकनाथ सणस, ज्येष्ठ क्रीडा पत्रकार, अशोक बोभाटे, नवनाथ दांडेकर, सुनील सकपाळ, राजेश दळवी यांच्यासह शालेय खेळाडू व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

फॉर्म जी
मुंबई येथे स्थावर मालमत्ता व्यवसायामध्ये कार्यरत
एसक्यू इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेडकरिता
स्वारस्य अभिव्यक्तीचे आमंत्रण
(भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ (कॉर्पोरेट व्यक्तींकरिता दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ३६ए (१) अन्वये)

| संबंधित तपशील | | |
|---|---|---|
| १. | कॉर्पोरेट ऋणकोचे नाव व पॅन/सीआयएन / एलएलपी क्र. | एसक्यू इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड सीआयएनः U45400MH2001PTC133888 पॅन: AABCG7392R |
| २. | नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता | ५, मजला - १, प्लॉट क्र. ७, शारदा सदन, स्वामी ज्ञानजीवनदास मार्ग, दादर रेल्वे स्टेशन, दादर (पूर्व), मुंबई - ४०००१४. |
| ३. | वेबसाईटचे यूआरएल | वेबसाईट नाही |
| ४. | बहुसंख्य अचल संपत्ती असलेल्या जागेचा तपशील | मुंबई, महाराष्ट्र |
| ५. | मुख्य उत्पादने/सेवांची स्थापित क्षमता | लागू नाही |
| ६. | गत वित्तीय वर्षामध्ये विक्री झालेल्या मुख्य उत्पादने/सेवांचे परिमाण आणि मूल्य | शुन्य |
| ७. | कर्मचारी/कामगारांची संख्या | ० |
| ८. | गत उपलब्ध दोन वर्षांची वित्तीय विवरणपत्रे (वेळापत्रकासह), धनकोंची यादी समाविष्ट असलेले पुढील तपशील उपलब्ध असणारे यूआरएलः | ठराव व्यावसायिकास cirp.sqinfrastructure@gmail.com येथे ईमेल लिहून तपशील/माहिती प्राप्त करता येईल. |
| ९. | संहितेच्या कलम २५(२)(एच) अन्वये ठराव अर्जदाराची पात्रता उपलब्ध असणारे यूआरएलः | ठराव योजना सादर करण्याकरिता पात्रता निकष तपशीलवार स्वारस्य अभिव्यक्तीकरिता आमंत्रणामध्ये उल्लेखिले आहेत. ("आमंत्रण") |
| १०. | स्वारस्य अभिव्यक्ती स्वीकारण्याकरिता अंतिम दिनांकः | २ मार्च, २०२४ |
| ११. | संभाव्य ठराव अर्जदारांची तात्पुरती यादी पारित करण्याचा दिनांक | १२ मार्च, २०२४ |
| १२. | तात्पुरत्या यादीवर आक्षेप सादर करण्याचा अंतिम दिनांक | १७ मार्च, २०२४ |
| १३ | संभाव्य ठराव अर्जदारांची अंतिम यादी पारित करण्याचा दिनांक | २७ मार्च, २०२४ |
| १४ | संभाव्य ठराव अर्जदारांना माहिती निवेदनपत्रिका, मुल्यांकन नमुना, ठराव योजनेकरिता विनंती पारित करण्याचा दिनांक | १ एप्रिल, २०२४ |
| १५ | ठराव योजना सादरीकरणाचा अंतिम दिनांक | १ मे, २०२४ |
| १६. | ईओआयकडे सादर करण्यासाठी प्रक्रिया ईमेल आयडी | cirp.sqinfrastructure@gmail.com |

दिनांक: १६ फेब्रुवारी, २०२४
ठिकाण: मुंबई

सही/-
अभिजित गोखले ठराव व्यावसायिक
नोंदणीकरण क्रमांक: IBBI/IPA-002/IP-N00964/2020-2021/13092
नोंदणीकृत पत्ताः ए/१९०३, १९ वा मजला, एन एल आर्यवर्ता, एन एल कॉम्प्लेक्स, दहिसर पूर्व, आनंद नगर समोर, मुंबई - ४०००६८.
एसक्यू इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेडकरिता

जाहीर सूचना

तमाम जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, (१) श्री. पराग भरत कुंभाणी आणि (२) श्री. मेहुल भरत कुंभाणी ("सदर मालक") यांच्या या खाली लिहिलेल्या अनुसूचीमध्ये अधिक तपशीलवारपणे वर्णन केलेल्या, एम. जी. रोड, गांधी मार्केट जवळ, घाटकोपर (पूर्व), मुंबई-४०० ०७७ येथे स्थित, असलेल्या आणि वसलेल्या पारेख मार्केट प्रिमायसेस को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड ("सदर संस्था") च्या "पारेख महल/पारेख मार्केट" ("सदर इमारत") या इमारतीच्या १ ल्या मजल्यावरील सदनिका क्र. २ मोजमाप ८१५ चौ.फू. कार्पेट क्षेत्रफळ ("सदर सदनिका") व त्यासह कार पार्किंग जागा ("सदर कार पार्क") व त्यासोबत संस्थेद्वारे पारित दिनांक ८ जुलै, २०११ रोजीच्या भाग प्रमाणपत्र क्र. २ अन्वये डिस्टिंक्टिव्ह क्र. ६ ते १० (दोन्ही समाविष्ट) धारण केलेले रु. ५०/- (रुपये पन्नास मात्र) प्रत्येकीचे ५ पूर्णतः भरणा केलेले समभाग यांच्या शीर्षकाची आम्ही तपासणी करीत आहोत.

मालकांनी असे सांगितले आहे की, ज्योत्स्ना कुंभाणी ("सदर ज्योत्स्ना") (दिवंगत) तिच्या हयातीदरम्यान सदर सदनिका आणि सदर समभागांमध्ये ३३.३३% अविभक्त हिस्सा, हक्क, शीर्षक आणि हितसंबंधांकरिता हक्कदार होती. सदर ज्योत्स्ना हिचे दि. १५ एप्रिल, २०२१ रोजी निधन झाले आणि तिने तिच्या पश्चात तिचे इच्छापत्र आणि मृत्युपत्र दिनांक ३ फेब्रुवारी, २०२१ मागे ठेवले आहे. सदर इच्छापत्रानुसार सदर सदनिका आणि सदर समभागांमधील तिचे हक्क येथील मालकांच्या नावे मृत्युपत्राद्वारे सोडले होते. त्यानुसार, संस्थेने सदर ज्योत्स्नाचे सदर सदनिका आणि सदर समभागांमधील हक्क येथील मालकांच्या नावे हस्तांतरित केले.

सदर सदनिका आणि सदर समभाग आणि सदर कार पार्क किंवा त्याच्या कोणत्याही भाग/खंडाविरोधात, त्यामध्ये किंवा त्यावर विक्री, हस्तांतरण, अदलाबदल, भाडेपट्टी, उप-भाडेपट्टी, भाडेपट्टीकरिता करारपत्र, नियुक्ती, बोजा, गहाणवट, प्रभार, धारणाधिकार, भागिदारी, वारसा, मृत्युपत्र, उत्तराधिकार, भेट, देखभाल, वहिवाट, न्यास, भाडेकरू, पोट-भाडेकरू, लिव्ह अ‍ॅण्ड लायसन्स, काळजीवाहू, आधारे, भोगवटा, ताबा, कौटुंबिक व्यवस्था, तडजोड, कंत्राट/करारपत्रे, बार्टर व्यवस्था, हमी, करार, न्यास, वक्फ, मार्गाचा हक्क, आरक्षण, प्रलंबित कायदेशीर कारवाई, लाभार्थी हितसंबंध, त्याग, विभागणी, मुखत्यार पत्र, तारण, कर्जे, अग्रीम, आदेश किंवा कायद्याच्या कोणत्याही न्यायालय किंवा कोणत्याही इतर वैधानिक किंवा निर्णय घेणारे प्राधिकारी किंवा लवादाचा हुकूम किंवा निर्देश किंवा आदेश, शीर्षक कागदपत्रांच्या ठेवींचे ज्ञापन, प्रतिभूती या मार्गे किंवा अन्यथा कशाही प्रकारे कोणताही प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष, लिखित किंवा मौखिक, हिस्सा, हक्क, शीर्षक, लाभ, हितसंबंध, दावा, आक्षेप आणि/किंवा कोणत्याही स्वरुपाची मागणी असणाऱ्या सर्व आणि कोणत्याही व्यक्ती(क्तीं)नी त्याबाबत लेखी स्वरुपात, सहाय्यक कागदोपत्री पुराव्यासह निम्नस्वाक्षरीकारांना २०४-बी, २ रा मजला, "हॉलमार्क बिजनेस प्लाझा", गुरुनानक रुग्णालयाजवळ, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ येथील दिनांकापासून १४ दिवसांच्या आत सूचित करावे, असे न केल्यास सदर सदनिका आणि सदर समभाग आणि सदर कार पार्किंग जागेमधील असा कोणताही हक्क, शीर्षक, लाभ, हितसंबंध, दावा आणि/किंवा मागणी सोडून दिला आणि/किंवा गुंडाळून ठेवला आणि असा कोणताही हक्क, शीर्षक, लाभ, हितसंबंध, दावा आणि/किंवा मागणी अस्तित्वात नाही असे समजण्यात येईल आणि आमचे अशील अशा दावा आणि/किंवा आक्षेपाच्या, जर असल्यास, कोणत्याही संदर्भ/आधाराशिवाय व्यवहार पूर्ण करतील आणि तो दावा किंवा आक्षेप सोडून दिला आणि/किंवा गुंडाळून ठेवला असे समजण्यात येईल.

वरील उल्लेखित अनुसूची
(सदर सदनिका आणि सदर समभाग आणि सदर कार पार्किंग जागेचे वर्णन)

एम. जी. रोड, गांधी मार्केट जवळ, घाटकोपर (पूर्व), मुंबई-४०० ०७७ येथे स्थित, असलेल्या आणि वसलेल्या पारेख मार्केट प्रिमायसेस को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेडच्या "पारेख महल/पारेख मार्केट" या इमारतीच्या १ ल्या मजल्यावरील सदनिका क्र. २ मोजमाप ८१५ चौ.फू. कार्पेट क्षेत्रफळ व त्यासह कार पार्किंग जागा व त्यासोबत संस्थेद्वारे पारित दिनांक ८ जुलै, २०११ रोजीच्या भाग प्रमाणपत्र क्र. २ अन्वये डिस्टिंक्टिव्ह क्र. ६ ते १० (दोन्ही समाविष्ट) धारण केलेले रु. ५०/- (रुपये पन्नास मात्र) प्रत्येकीचे ५ पूर्णतः भरणा केलेले समभाग.

दिनांक १५ फेब्रुवारी, २०२४

मे. लॉ ओरिजिन
सही/-
भागिदार

